# महिला आयोग पोलिसांवर नाराज

## रोशनी शिंदे मारहाण : मंगळवारी ठाणे पोलीस आयुक्तांना हजर राहण्याचे आदेश

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या कार्यकर्ती रोशनी शिंदे यांना झालेल्या मारहाणी प्रकरणी पोलीस आयुक्तांनी सादर केलेल्या अहवालावर राज्य महिला आयोगाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पोलिसांनी केलेल्या कारवाईत त्रुटी असल्याचे अहवालातून स्पष्ट दिसून येत आहे. त्यामुळे पोलीस कारवाईबाबत आयोग असमाधानी आहे, असे सांगत आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी ठाणे पोलीस आयुक्तांना मंगळवारी आयोगाच्या कार्यालयात हजर राहून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे ठाणे पोलीस आयुक्त रोशनी शिंदे मारहाणी प्रकरणी काय अहवाल सादर करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

ठाणे येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे ) गटाच्या कार्यकर्ती रोशनी शिंदे यांना शिवसेनेच्या शिंदे गटाच्या महिला कार्यकर्त्यांकडून मारहाण झाली होती. मारहाणीत जखमी झालेल्या रोशनी शिंदे यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या मारहाणीची दखल घेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांनी ठाणे येथे रुग्णालयात भेट घेऊन विचारपूसही केली होती.

### रोशनीला जामीन मंजूर

- फेसबुकवर आक्षेपार्ह पोस्ट केल्याप्रकरणी रोशनी शिंदे हिच्यावर कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात तिला ठाणे न्यायालयाने अटकपूर्व जामीन मंजूर केला.



विशेष म्हणजे पोलिसांनी रोशनी शिंदे यांच्यावरील मारहाणीचा गुन्हाही दाखल केला नव्हता. मात्र, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी मारहाणीची गंभीर दखल घेत ठाणे पोलीस आयुक्तांना तातडीने अहवाल सादर करण्याची सूचना केली होती. त्यानुसार कासारवडवली पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी आव्हाड हे अहवाल घेऊन आयोगाच्या कार्यालयात उपस्थित राहिले होते.

अहवालात या प्रकरणी दोन अनोळखी महिलांविरोधात अदखलपात्र गुन्हा नोंद करून न्यायालयाच्या परवानगीने पुढील तपास सुरू असल्याची माहिती या अहवालात नमूद करण्यात आली आहे.

रोशनी शिंदे यांच्या कार्यालयात घुसलेल्या जमावातील लोक व तेथे झालेला वाद माध्यमांनी प्रसारित केलेल्या चित्रफितींमध्ये स्पष्टपणे दिसत आहे.

पोलिसांनी केलेल्या कारवाईत त्रुटी असल्याचे अहवालातून दिसून येत आहे. त्यामुळे पोलीस कारवाईबाबत आयोग असमाधानी असल्याचे अध्यक्षा चाकणकर यांनी आयुक्तांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे.

या मारहाणप्रकरणी उपलब्ध असलेल्या स्वयंस्पष्ट पुराव्यांच्या आधारे तपास करून ठाणे पोलीस आयुक्तांनी या प्रकरणी मंगळवारी, ११ एप्रिल रोजी महिला आयोगाच्या अध्यक्षांच्या कार्यालयात दुपारी १२.३० वाजता व्यक्तिशः उपस्थित राहून अहवाल सादर करण्याची सूचना चाकणकर यांनी केली आहे. यासंदर्भातील पत्र चाकणकर यांनी ट्विट केले आहे.